## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१४/०५/२०१९
## दि.१३/०५/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे २०३/१९,भादविक ३६३,३९२,१७०,३२३,५०४,३८४,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३४ वर्षे,रा.सातव वस्ती,खराडी,पुणे |
| **आरोपी** | एकुण तीन इसम, रा.एकलहरे,ता.आंबेगाव,जि.पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०४/१९ रोजी सकाळी १०/३० ते १६/३० वा.चे दरम्यान रक्षकनगर गोल्ड सोसायटीचे लगत,स्नेहदीप सोसायटीच्या गेट जवळ,खराडी,पुणे ते चिखली पोलीस अंतर्गत साने पोलीस चौकी,युनिअन बँक एटीएम,खराडी,पुणे व निर्मला कॉन्व्हेंट स्कुल,खराडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांपैकी एका इसमाने,फिर्यादी यांचे विरुध्द चिखली पोलीस अंतर्गत साने पोलीस चौकी येथे तक्रार दाखल आहे अशी खोटी माहिती देऊन,इतर दोन इसमांनी ते पोलीस असल्याची बतावणी करून,फिर्यादी यांची कार ही रक्षकनगर गोल्ड सोसायटीच्या लगत, स्नेहदीप सोसायटीच्या गेटजवळ,खराडी,पुणे येथे उभी असताना,सदर इसमांनी त्यांना जबरदस्तीने गाडीत बसवुन,त्यांना मानसिक त्रास देऊन मारहाण करुन,फिर्यादी यांचेकडे १ लाख रुपयेची मागणी करुन,फिर्यादीस साने पोलीस चौकी येथे घेऊन जाऊन, त्यांचे गाडीतील प्रोजेक्टर काढुन घेऊन,पुन्हा त्यांचे दोन बँकेचे एटीएम कार्ड मधुन बँकेचे एटीएम,खराडी,पुणे येथुन ४,०००/- रुपये जबरदस्तीने काढुन घेऊन,पुन्हा मारहाण करुन, त्यांचेकडील मोबाईल हॅण्डसेट मधील सिम कार्ड काढुन,फिर्यादीस देऊन तो हॅण्डसेट घेऊन निघुन गेले. (सदरचा गुन्हा अर्जावरुन दाखल करण्यात आलेला आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ए.जी.मोरे ९८२३३९८१०३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे १६९/१९,भादविक ४०७,४०८,४६८,४७१,४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४२ वर्ष,रा.विधाते कॉलनी,औंध,पुणे |
| **आरोपी** | १.भईरी प्रणय बिनीत,वय-२९,रा.पो.कागलनगर,जमशेदपुर,झारखंड (अटक) व ट्रान्सपोर्टवरील अज्ञात वाहन चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे जानेवारी २०१९ ते एप्रिल २०१९ या कालावधी मध्ये गोदरेज मिलीनिएम बिल्डींग,सेंट मिरा मुलींचे कॉलेज जवळ,कोरेगाव पार्क,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे Leadec India Ltd. या कंपनीने जानेवारी २०१९ ते एप्रिल २०१९ या कालावधीमध्ये जमशेदपुर येथील Wabco India Ltd. कंपनी व Knorr Bremse या कंपनीस एक नामांकीत कंपनीचे मोटर्स ट्रकचे पार्ट हे वायरमेश पॅकेजिंग इक्युपमेंटद्वारे पॅक करुन मटेरियल सप्लाय केलेनंतर,फिर्यादी यांचे कंपनीतील लॉजिस्टीक एक्झीक्युटीव्ह भईरी प्रणय बिनीत याने कंपनीतील जुना कामगार व ट्रान्सपोर्टवरील वाहन चालक यांचेशी संगनमत करुन,स्वतःचे आर्थिक फायदयासाठी बनावट डिलेव्हरी चलन तयार करुन,कंपनीचे मोठे इक्युपमेंट ३२२ नग व मोठे लिड ४६८ नग,तसेच लहान इक्युपमेंट ४०० नग व लहान लिड २३२ नग असे एकुण लहान मोठे इक्युपमेंट ७२२ नग व लहान मोठे लिड ७०० नग यांची परस्पर विल्हेवाट लावुन,फिर्यादी यांचे कंपनीची एकुण ५३,६७,४००/- रुपयेची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. ए.एस.शिंदे ९६६५९९९९८२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १२१/१९,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३० वर्ष,रा.न-हे,पुणे |
| **आरोपी** | एकुण तीन इसम,रा.दिल्ली (अटक नाही) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे डिसंबर-२०१८ ते माहे जानेवारी-२०१९ रोजीचे कालावधीत एयबीआय बँक,एरंडवणे शाखा,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना फ्रॅन्टीक टेक्नॉलोजी (ओपीसी) प्रा.लिमी.नवी दिल्ली यांचेकडुन उत्तर प्रदेश सरकारचे सॉईल हेल्थ कार्ड डाटा सबमीशन आणि लॅमीनेशनचे काम देतो असे सांगुन,दि.२९/१२/२०१८ रोजी फ्रॅन्टीक टेक्नॉलोजी (ओपीसी) प्रा.लिमी.नवी दिल्ली येथील बँकेचे खात्यावर ३०,०००/- रुपये व दि.०१/०१/२०१९ रोजी ४२,०००/- रुपये असे एकुण ७२,०००/- रुपये फिर्यादी यांचे एरंडवणे शाखेतील बँकेतुन एनईएफटी करुन पाठविले तसेच सदर कामाचा मोबदला दिला नाही. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. वैशाली आडकुर ९७६५५४२७३३ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे १६७/१९,भादविक ४२०,माहिती तंत्रज्ञान का.२००० चे क.६६(सी),६६(डी) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-६० वर्षे,रा.बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपी** | एकुण दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०३/२०१९ ते दि.०५/०३/२०१९ रोजीचे कालावधीत बिबवेवाडी,पुणे येथील सिंडीकेट बँकेतील पेन्शन खात्यामधुन ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी फेसबुकवरुन (AVK CART) या साईटवरती एक साडी खरेदी केली असता,त्यांनी दुसरी साडी दिल्याने,साईटवरील यातील नमुद इसमांबरोबर दि.०४/०३/२०१९ रोजी फिर्यादी यांनी संपर्क केल्याने,सदर इसमांनी लिंक पाठविल्यानंतर फिर्यादी यांनी सदर लिंग ओपन करुन प्रोसेजर केली असता,दि.०५/०३/२०१९ रोजी त्यांचे पतीचे बँकेतील पेन्शन मधील खात्यामधुन एकुण चार वेळा ट्रान्झेक्शन होवुन,सदर खात्यामधुन एकुण ४४,९९८/- रुपये काढुन घेवुन,फिर्यादी यांची अर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. के.बी.पावसे ८१०८१८१८६४ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे १४३/१९,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-२७,रा.घोरपडी गांव,पुणे |
| **आरोपी** | मोबाईल व पेटीएम धारक अज्ञात इसम व महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०२/२०१९ रोजी ११/४५ वा. फिर्यादीचे राहते घरी मोबाईल व पेटीएमवरून |
| **तपशिल** | यातील नमुद मोबाईल व पेटीएम धारक अज्ञात इसम व महिला यांनी फिर्यादीस मोबाईल दवारे कॉल करुन,मी ॲमेझॉन कंपनी मधुन बोलत आहे,तुम्ही लकी विनर आहात असे सांगुन कंपनीमार्फत तुम्हाला गिफ्ट देणार असल्याचे सांगुन,त्यांनी त्यांचे पेटीएमचे खात्यावर एकुण ९०,००६/- रुपये टाकण्यास भाग पाडुन,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. डी.एस.गुरव ९९२३८७९३९८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**